राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -१०८/२०१८/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी |
|---|---|
| श्री. निलेश प्रकाश निकम | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक, विशेष पोलीस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्र कार्यालय, कोल्हापूर |

(निर्णय दिनांक- १८.०२.२०२५)

तक्रारदार यांनी दिनांक ३१/०७/२०१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांनी 'त्यांच्या दिनांक २४/०५/२०१८ रोजी गृह विभागास केलेल्या माहिती अर्जानुसार माहिती मिळाली नाही, त्यांच्या प्रथम अपिलाची दखल घेतली नाही', अशा आशयाची तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ मधील तरतुदीमध्ये तक्रार प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासंदर्भात कोणतीही स्पष्ट तरतूद नमूद केलेली नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे. त्यानुसार आयोगाच्या आदेशानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (९) नुसार राज्य माहिती आयोग तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

तक्रारदार यांच्या तक्रार अर्जात नमूद दिनांक २४/०५/२०१८ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात तक्रारदार यांनी दाखल केलेल व्दितीय अपील क्रमांक ३६२७/२०१८/कोल्हापूर यामध्ये आयोगाने दिनांक ०३/०६/२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

तक्रारदार यांच्या व्दितीय अपील प्रकरणी आयोगाने सुनावणी घेऊन आदेश पारित केला असल्यामुळे या तक्रार अर्जावर स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहेत.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

18/2/25

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.-१०८/२०१८/पुणे /7391/2025

दिनांक - 6/3/2025

रामाआ-पुणे/२०२५/RCG